राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना विविध प्रकल्पा-
संदर्भात काम करणाऱ्या विविध सल्लागार व इतर
संस्थांना सहकारी साखर कारखान्यांच्या प्रकल्पाचे
मूल्यांकन करण्यासाठी मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्रमांकः ससाका १००४/प्र.क्र.८६/३-स,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २४ जून,२००९

वाचा : १) शासन निर्णय,सहकार व वस्त्रोद्योग विभाग,क्रमांकःससाका- १००४/ प्र.क्र ८६/ ३स
दिनांक १० ऑगस्ट,२००४

२) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. जा.क्र साआ/उपप/कक्ष-१३/ कोजन/
२००९, दिनांक २९ मे, २००९

**प्रस्तावना :**

राज्यातील सहकारी साखर कारखान्याकडून नवीन कारखाना उभारणी, अस्तित्वात असलेल्या कारखान्यांचे आधुनिकीकरण, सहवीज निर्मिती, इथेनॉल डिस्टिलरी , पेपर व पार्टीकल बोर्ड इत्यादी प्रकल्प राबविण्यात येतात. सदर प्रकल्प राबविण्याचे टप्पे पाहून ते राबविल्यास कामामध्ये सुसूत्रता येऊ शकेल. यासाठी राज्यातील सहकारी साखर कारखान्यांच्या विविध प्रकल्पासंदर्भात प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट मांजरी, पुणे, नॅशनल शुगर फेडरेशन, नवी दिल्ली , मिटकॉन, पुणे व शुगर टेक्नॉलॉजि मिशन, नवी दिल्ली या संस्थांना संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच, प्रकल्प मंजूर झाल्यानंतर कार्यान्वित होईपर्यंत प्रकल्प उभारणीचे काम सुरळित होण्यासाठी नॅशनल शुगर फेडरेशन नवी दिल्ली व वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट मांजरी , पुणे या संस्थाना इन्स्पेक्टिंग एजन्सी म्हणून मान्यता देण्यात आलेली आहे.

राज्यातील उपपदार्थ निर्मिती प्रकल्पांची उभारणी विचारात घेता या प्रकल्पांची तपासणी करण्याच्या कामात वाढ झाली आहे. ही बाब विचारात घेता उपरोक्त दोन संस्था शिवाय मिटकॉन, पुणे या संस्थेस सहकारी साखर कारखान्यांच्या साखर व उप पदार्थ निर्मिती प्रकल्पाची इन्स्पेक्टिंग एजन्सी म्हणून मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय :-</u>

या शासन निर्णयाव्दारे राज्यातील सहकारी साखर कारखान्यांमार्फत उभारण्यात येणारे नवीन साखर कारखाने तसेच अस्तित्वात असलेल्या कारखान्यांचे आधुनिकीकरण व सहवीज निर्मिती, इथेनॉल, डिस्टिलरी, पेपर व पार्टीकल बोर्ड इत्यादी प्रकल्प मंजूर झाल्यानंतर कार्यान्वित होईपर्यंत प्रकल्प उभारणीचे काम सुरळित होण्यासाठी मिटकॉन, पुणे या संस्थेस इन्स्पेक्टिंग एजन्सी म्हणून मान्यता देण्यात येत आहे.

वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट, मांजरी पुणे, नॅशनल शुगर फेडरेशन, नवी दिल्ली व मिटकॉन, पुणे या संस्थापैकी एका संस्थेची सहकारी साखर कारखान्यांसाठी इन्स्पेक्टिंग एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात यावी. याबाबतची फी या संस्थांना समान आकारावी. प्रकल्प पूर्णत्वाचा दाखल देण्याच्या संदर्भात कोणत्याही प्रकल्पाची उभारणी पूर्ण झाल्याबाबतचा दाखला देण्याची जबाबदारी त्या त्या प्रकल्पाच्या इन्स्पेक्टिंग एजन्सीची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(पां.स. देवकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

प्रति,

१) सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) साखर आयुक्त,महाराष्ट्र राज्य, साखर संकुल,शिवाजीनगर, पुणे
३) सर्व प्रादेशिक सहसंचालक (साखर)
४) महालेखापाल-१ ,महाराष्ट्र मुंबई /महालेखापाल-२ महाराष्ट्र नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
५) महासंचालक, वसंतदादा साखर संशोधन संस्था मांजरी पुणे
६) व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय सहकारी विकास निगम, ४ सिरी, इन्स्टिट्यूशनल एरिया, नवी दिल्ली.
७) महाव्यवस्थापक, महाराष्ट्र इंडस्ट्रियल ॲण्ड टेक्निकल कन्सल्टंसी ऑर्गनायझेशन (मिटकॉन), पुणे
८) प्रादेशिक सहसंचालक (पश्चिम) राष्ट्रीय सहकारी विकास निगम, ५ बी.जे. रोड, पुणे
९) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक म., मुंबई
१०) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ म., मुंबई
११) निवड नस्ती